<u>नि.२७ खाली आदेश</u>

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६,नियम-१७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेकामी दाखल केलेला आहे.

२. वादींचे म्हणणे असे की, वादीने प्रस्तुतचा दावा वाटप, ठराव व निरंतर मनाई करिता दाखल केलेला आहे. वादीस काही तांत्रीक कारणामुळे दाव्यातील विनंती कलम ८ड मधील मजकुर वगळणेची परवानगी मिळणेची विनंती केली आहे. तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही अशी विनंती केली आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा हि विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी नि.क्र ३० प्रमाणे म्हणणे देउन वादीने दाखल केलेला दुरुस्तीचा अर्ज हा कायदयास अनुसरुन नसल्याचे सांगितले आहे. तसचे परिच्छेद ४ व ६ मधील गटवारीचकडचे वाटप बाबतचा मजकुर हा दाव्यामध्ये नमुद आहे त्यामुळे सदरील मजकुर हा वगळलयाशिवाय वादीस प्रस्तुतची दुरुस्ती करता येणार नाही व सदरचा अर्ज वादी यांनी २ वर्षानंतर दाखल केलेला आहे या कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. प्रतिवादींचे विधिज्ञ गैरहजर. वादीचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटप, ठराव व निरंतर मनाई करिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादीने विनंतीचे परिच्छेदामध्ये कलम ड प्रमाणे दि.१२/१०/१९७९ रोजीचे वादी व प्रतिवादींचे वडिलांचे गटवारी अधिका-यांनी जाब जबाब घेतल्याचे दाखवुन दावा जमीनीचे अत्यंत चुकीच्या पध्दतीने कागदोपत्री दाखविलेले धडे वाटप तसेच वादी व प्रतिवादी यांचे वाड वडिलांचे घेतलेले जाबजबाब हे सर्व बेकायदेशीर आणि रदद बातल असुन ते वादीवर बंधनकारक नाही असा ठरावा करण्यात यावा हि मागणी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादींनी सदर मागणीवरुन प्रस्तुतचा दावा मुंबई तुकडेजोड तुकडे बंदी प्रतिबंध कायदा १९४७ च्या कलम ३६अ प्रमाणे सदरचा दावा या न्यायालयास चालविण्याचा अधिकार आहे का असा प्राथमिक मुददा काढण्यात

यावा म्हणुन नि.क्र २२ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यातील सदर मागणी वगळण्याकरिता दाखल केलेला आहे.

६. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६, नियम-१७ नुसार दाखल केलेला आहे. सदर तरतुदीनुसार दाव्याचे पक्षकार दाव्याच्या कोणत्याही टप्पयावरती त्यांच्या वाद कथनामध्ये दुरुस्ती करु शकतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने वाटप तसेच त्याचा दावा मिळकतीत हिस्सा असल्याचा ठराव व मनाई असा हुकुम मिळावे अशी विनंती केलेली आहे. प्रस्तुत दाव्यातील कलम ड मधील मागणी देणे हे या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या कक्षेत येत नसल्याने वादी सदर मागणी वगळण्यात यावी अशी विनंती करत आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याकरिता कोणतेही सबळ कारण दिसुन येत नाही. तसेच प्रतिवादीचे म्हणणे असे की, वादीने दाव्यामध्ये परिच्छेद क्रं ४ व ६ मध्ये गटवारीकडचे वाटपबाबातचा मजकुर दाव्यामध्ये नमुद आहे व तो वगळल्याशिवर वादीस दुरुस्ती करता येणार नाही. प्रतिवादीची हरकत ध्यानात घेता हे ध्यानात घेणे गरजेचे आहे कोणत्याही दाव्याचे अधिकारक्षेत्र ठरविताना मागणी ध्यानात घेणे जरुरीचे असते. त्यामुळे प्रतिवादीने घेतलेल्या हरकतीमुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणे उचित होणार नाही.

७. सदर दाव्यात अद्याप मुद्दे काढलेले नाही. तसेच सदर दुरुस्ती केल्याने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. या ठिकाणी हे ध्यानात घेणे गरजेचे आहे की, वादीने मागणी केलेली दुरुस्ती मंजूर केली नाही, तर विनाकारण इतर कार्यवाही वाढण्याची शक्यता आहे. या उलट सदर दुरुस्ती मंजूर केली तर सदरचा दावा गुणदोषावर चालविणेस मदत होईल. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता, वादीने मागीतलेली दुरुस्ती ही दाव्याचा न्यायनिवाडा करणेसाठी जरुरीची आहे. तसेच प्रतिवादीस त्याच्या बचावा करिता सदर दुरुस्त दाव्यास कैफियत देण्याचा अधिकार आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादीचे गैरसोय होणार आहे. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास वादीस विलंब झाला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जाने निश्चितच प्रतिवादीची गैरसोय होणार आहे. परंतु त्याची भरपाई वादीं वरती वाद खर्च लादुन करता येईल. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे वरील

सर्वबाबी व कारणमिमांसा, आणि न्यायाचे उद्दीष्ट ध्यानात घेता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आला:

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.२७) खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. वादीने दाव्यामध्ये नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्त प्रत विहित कालावधीमध्ये दाखल करावी. तत्पुर्वी वादीने प्रतिवादीस रक्कम रु.२००/- वादखर्च दयावा.

HARSHADA UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UTTAM PATIL
Date: 2022.04.30 12:16:09 +0530

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे.

दिनांक :२८/०४/२०२२

# Certificate

**“I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.**
**Name of the Steno : V.G.Fulari**
**Court Name : H.U.U. Patil**
**Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.**
**Date : 28/04/2022**
**Order signed by presiding officer on :28/04/2022**
**Order uploaded on : 30/04/2022.**